वरुड पंचायत समिती जि. अमरावती प्रशासकीय इमारतीच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१७/प्र.क्र. १८७/बांधकाम-४
मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: ०२ फेब्रुवारी, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय क्र. पंसई २०१०/ प्र.क्र. १९४/ पंरा-७ दि. ३०.१२.२०१०
२) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्र. जिप/बांध/ तां-३/५३८२/२०१७ दि. २४.०७.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी संदर्भीय पत्रान्वये वरुड पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. वरुड पंचायत समिती जि. अमरावती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास दिनांक ३०.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये रु. १६६.९५ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून प्रशासकीय मान्यते एवढा निधी जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे. वरुड पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या ठिकाणी दैनंदीन कामकाज सुरु करण्याच्या दृष्टीने फर्निचरची नितांत आवश्यकता आहे.

३. वरुड पंचायत समितीकरीता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मंजूर करतेवेळी अंदाजपत्रकामध्ये फर्निचरची बाब अंतर्भूत करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्या ठिकाणी नवीन अंतर्गत फर्निचर सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, अमरावती यांचेकडील मंजुर दरानुसार रुपये १४,५२,४००/- इतक्या किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक सादर केले आहे. सदरील अंदाजपत्रक सन २०१४-१५ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले असून त्यास कार्यकारी अभियंता (बांध.) जिल्हा परिषद अमरावती यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

४. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या तांत्रिक छाननी अंती, वरुड पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत रुपये १४.५२ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

५. वरुड (जि. अमरावती) पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेच्या एकूण रक्कम रुपये १४,५२,०००/- (रुपये चौदा लक्ष बावन्न हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामांस पुढील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहेः-

१) वरुड पंचायत समितीच्या ठिकाणी शासन निर्णय, सा.बां.वि.क्र.सीएटी-१०९६/प्र.क्र.१७२/ इमारती-२, दि.७.१.२००४ नुसार विहीत केलेल्या नोंदणीकृत फर्निचर /मॉड्युलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकार यांच्याकडून विहीत कार्यपध्दती अनुसरुन फर्निचरचे काम करुन घेणे बंधनकारक राहील.

२) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जि.प. यांनी दक्षता घ्यावी.

३) या कामी प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा अधिक खर्च झाल्यास तो पंचायत समिती/ जिल्हा परिषदेने सोसावा.

४) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त एका वर्षात पूर्ण होईल, असे संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जि.प. यांनी नियोजन करावे.

५) प्रस्तुत कामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.) जि.प. यांनी दक्षता घ्यावी.

६. वरुड पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या अंतर्गत फर्निचर सुविधेच्या कामाच्या अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा पुढील प्रमाणे आहेः-

FINAL GENRAL ABSTACT FOR VARUD P.S. FURNITURE WORKS		
Sr.	Description of item	Cost Rs.
1	Cost of Furniture works	1097529.00
2	Add Supplying and fixing Air Coolers	300000.00
3	Add for Centage charges 5 %	54876.00
	Total Rs.	1452405.00
	Says Rs.	1452000.00

७. उपरोक्त बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर अनुदान स्वरुपात टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरीत करण्यांत येईल. यावरील खर्च " २५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

८. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्वरेने तांत्रिक मान्यता घेण्यात येवून त्याची प्रत शासनास सादर करावी.

९. प्रस्तुत कामाची माहिती कंस्ट्रक्शन ट्रॅकर प्रणालीवर अद्ययावत करावी.

१०. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पांच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०२०२११०३१७९८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.02.02 11:26:04 +05'30'

(दि.बा पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद
२) विभागीय आयुक्त अमरावती विभाग, अमरावती
३) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४) मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो.,कॅम्प ऑफिस, मध्यवर्ती इमारत, पुणे
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
६) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
७) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
८) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद अमरावती
९) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा अमरावती
१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
११) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा अमरावती विभाग, अमरावती
१२) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, अमरावती
१३) सभापती, पंचायत समिती, वरुड, जिल्हा अमरावती
१४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वरुड, जिल्हा अमरावती
१५) निवडनस्ती-बांधकाम-४